महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महाज्योतीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांना बैठकीसाठी वेळ मिळत नसल्याने पीएचडीसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) साठी प्रतिक्षा करावी लागत असल्याबाबत

(१) ३३३८५ (१२-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योतीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांना बैठकीसंदर्भात दिरंगाई होत असल्याने पीएचडीसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) साठी प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीएचडीसाठी सन २०१७ मध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे,
दिनांक ३१ मे २०२१ च्या संचालक मडळाच्या बैठकीत एप्रिल २०१७ पासुन पीएचडी करीता नोंदणी करण्यात आलेल्या उमेदवारांना या योजनेचा लाभ देण्याचे निश्चित केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील पिक विमा वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

(२) ३३६४२ (०६-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखे अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना सन २०१६ मध्ये मंजुर झालेल्या पिक विमा वाटपाच्या रक्कमेत गैरव्यवहार झाला असून पीक विमा कंपनीकडून हेक्टरी रुपये २०,३३१ मंजुर झालेले असताना बँकेने शेतकऱ्यांना केवळ रुपये १५,०००/- दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना पीक विम्याची उर्वरित रक्कम मिळून उक्त प्रकरणी चौकशी करण्याची मागणी मौजे मरवळी येथील शेतकरी व लोकप्रतिनिधीं यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकेच्या माध्यमातून योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना मिळालेल्या नुकसान भरपाईमध्ये तफावत दिसून येत असल्याचे मा.कृषी मंत्री यांनी कबूल केले असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करण्याबाबतचे निर्देश दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेले असताना अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पिक विमा वाटपामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१४-११-२०२२) : (१) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा नायगांव यांनी भारतीय कृषि विमा कंपनीस सादर केलेल्या विमा प्रस्तावामध्ये सोयाबीन पिकाचे २२८९.९७ हे. क्षेत्राऐवजी १६०० हे. क्षेत्र चुकीने नमुद केले होते. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विमा कंपनीमार्फत सोयाबीन पिकाकरीता प्रति हेक्टरी रक्कम रु. २०३३१/- निश्चित करण्यात आलेल्या नुकसान भरपाई रकमेऐवजी प्रति हेक्टरी रक्कम रु. १५०००/- अशी बँकेमार्फत कमी वाटप करण्यात आली असून त्यामध्ये तफावत दिसून येते.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा नायगांव यांच्या चुकीमुळे योजनेत सहभागी शेतकऱ्यांना मिळालेल्या नुकसान भरपाईमध्ये तफावत असले बाबत स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा नायगांव यांनी मान्य केले आहे.

उर्वरित नुकसान भरपाई अदा करणेबाबत निमंत्रक राज्यस्तरीय बॅंकर्स समिती, पुणे यांना दिनांक २३ जुलै, २०२० व दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० अन्वये कळविण्यात आले होते. तसेच केंद्र शासनास याबाबत अवगत करुन स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, नायगांव यांना उर्वरित नुकसान भरपाई पात्र शेतकऱ्यांना तात्काळ अदा करणेबाबत आदेशित करणेबाबत कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे सदर मुद्दा दिनांक १०.११.२०२० व दि. ०४.०२.२०२१ रोजी केंद्र शासनाकडील झालेल्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या Video Conference द्वारे आयोजित बैठकीत उपस्थित करण्यात आलेला असून प्रलंबित नुकसान भरपाई वाटपाचे निर्देश संबंधित स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. तथापि, जुलै २०२२ अखेरपर्यंत तफावतीची रक्कम शेतकऱ्यांना अदा न झाल्याने दिनांक २९.८.२०२२ च्या पत्रान्वये केंद्र शासनास स्टेट बँक ऑफ इंडिया, नायगांव शाखा यांना नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यासंदर्भात आदेशित करण्याबाबत पुनश्च: कळविण्यात आले आहे. तसेच, दिनांक २९.८.२०२२ च्या पत्रान्वये स्टेट बँक ऑफ इंडिया, नायगांव यांनाही नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्याचे कळविण्यात आले आहे. दिनांक २.९.२०२२ रोजी भारतीय कृषि विमा कंपनी व स्टेट बँक ऑफ इंडिया अधिकारी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत बँकेने नुकसान भरपाई देणेचे कबूल केले आहे. त्यानुसार बँकेला संबंधित शेतकऱ्यांना अनुज्ञेय प्रलंबित नुकसान भरपाई सप्टेंबर २०२२ अखेरपर्यंत वाटपाचे निर्देश दिले आहेत.

शासकीय जमीनीतुन खाजगी कामासाठी नियमबाह्य मुरूम उत्खनन करण्यास परवानगी दिल्या प्रकरणी चौकशी करणे बाबत

(३) ३४२१५ (०७-०१-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय जमीनीतुन खाजगी कामासाठी नियमबाह्य मुरूम उत्खनन करण्यास परवानगी दिल्याप्रकरणी चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी व त्या सुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-११-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, माजलगांव यांच्यामार्फत केलेल्या चौकशीमध्ये मुरूम उत्खननाची सदर परवानगी देण्यात आली असल्याचे आढळून आले. तसेच त्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांचेस्तरावर दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधित लोकप्रतिनिधी यांना कळविले आहे.

कृषी, औद्योगिक, व्यावसायीक आणि रहिवाशी कारणासाठी शासनाने प्रदान केलेल्या जमिनी (कलेक्टर लॅण्ड) धारणाधिकाराबाबत

(४) ३४५३० (०७-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी, औद्योगिक, व्यावसायिक आणि रहिवाशी यांना शासनाने प्रदान केलेल्या जमिनी (कलेक्टर लॅण्ड) धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये हस्तांतरीत करण्याच्या आदेशाला शासनाने दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी दिलेली स्थगिती उठविली असल्याबाबतची अधिसूचना दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाने वितरित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे शासनाच्या किती जमिनी वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये संबंधितांच्या नावे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जमिनी वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये संबंधितांच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-११-२०२२) : (१) दिनांक २८ जानेवारी,२०२१ रोजीच्या पत्रानुसार सदर स्थगिती उठविण्यात आली आहे.
(२) व (३) दिनांक ८/३/२०१९ रोजीच्या नियमातील तरतूदीनुसार धारणाधिकार भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरण केलेल्या सर्व विभागीय निहाय एकूण प्रकरणाची संख्या पुढील प्रमाणे आहे:-

१)	कोकण विभाग-	४०९
२)	पुणे विभाग-	७३०
३)	नाशिक -	२१५१
४)	औरंगाबाद -	३४
५)	अमरावती -	२१४
६)	नागपूर विभागाची	२४५
	एकुण	३७८३

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबेजोगाई (जि. बीड) तालुक्यातील सीताफळ संशोधन केंद्राच्या बळकटीकरणा

(५) ३४६१० (०७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबेजोगाई (जि. बीड) तालुक्यातील सीताफळ संशोधन केंद्रातील प्रयोगशाळेत प्रामुख्याने सीताफळातील गुण वैशिष्ट तपासली जात असल्यामुळे सीताफळावर प्रक्रिया करून त्यावर उपपदार्थ बनवण्यासाठी लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्रीसाठी सदर विद्यापीठामार्फत शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सीताफळ संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास निधी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासमारास निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
अंबेजोगाई,जि.बीड येथील सीताफळ संशोधन केंद्राअंतर्गत सीताफळ संशोधन प्रयोगशाळा बळकटीकरणाचा प्रस्ताव वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी शासनास सादर केला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या विद्यापीठास संशोधनाकरीता अर्थसंकल्पीत केलेल्या निधीमधून अंबेजोगाई सीताफळ संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी प्रयोगशाळेच्या अत्यावश्यक बाबींकरीता परभणी कृषि विद्यापीठास निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत क्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा पुतळा स्थापन करण्याबाबत

(६) ३५१३७ (०२-०२-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा असल्यामुळे आदिवासी समाजाच्या भावना ओळखून दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या उद्घाटनाच्या आधी नवीन पालघर जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासकीय इमारतीच्या समोर म्हणजेच मुख्य प्रवेशद्वाराजवळ क्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा पुतळा स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०२१ वा त्या दरम्यान ईमेलद्वारे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीची पूर्तता करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-१०-२०२२) : (१), (२) व (३) विषयांकित प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५.०८.२०२१ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले होते.
पालकमंत्री, पालघर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू व नियंत्रण समितीची बैठक दिनांक १८.११.२०२१ रोजी घेण्यात आली असून त्यांनी पालघर जिल्हा मुख्यालयात क्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा पुतळा उभारण्याबाबत शासन आदेश/मार्गदर्शक सुचनांनुसार किती क्षेत्राची गरज आहे, त्यानुसार जागा निश्चित करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील पाटखळ महसूल मंडळामध्ये हाजापूर,हिवरगांव, भाळवणी, जालिहाळ हया गावांचा समावेश करण्याबाबत

(७) ३५५२५ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात ७ महसूल मंडळ कार्यरत असून वाढती लोकसंख्या व महसूलमधील वाढता कार्यभार विचारात घेता, पाटखळ हे नवे महसूल मंडळ तयार करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाटखळ महसूल मंडळामध्ये गावांचा समावेश करत असताना गणेशवाडी, कचरेवाडी, पाटखळ, डोंगरगाव, खोमनाळ, फटेवाडी, डोणज,भालेवाडी या गावांचा समावेश करण्यात आला असून या मंडळालगतची हाजापूर,हिवरगांव, भाळवणी, जालिहाळ ही गावे जोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) : (१) होय.

(२) सदर बाब आढळून आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील शेतकरी गट व महिला बचत गटांना करण्यात आलेल्या साहित्य पुरवठयाची चौकशी करण्याबाबत

(८) ३८२०६ (०१-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील शेतकरी गट व महिला बचत गटांना जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत पुरवठादारांकडून निकृष्ठ दर्जाच्या साहित्यांचा पुरवठा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरवठा करण्यात आलेली शेती उपकरणे व इतर साहित्य थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) ने शेतक-यांनी स्वतः विकत घ्यावयाचे होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (बीटीएम) यांनी पुरवठादारांशी संगनमत करून निकृष्ठ दर्जाच्या साहित्याचा पुरवठा केल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करुन चौकशी अहवालाच्या आधारे संबंधिताचे विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम१९७९ मधील नियम ८ अन्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येत आहे.

राज्याची वाढती लोकसंख्या आणि वाढत्या नागरीकरणाच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या नविन तलाठी भरतीची पदे रिक्त असल्याबाबत

(९) ३८३९५ (०१-०४-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढती लोकसंख्या आणि वाढत्या नागरीकरणाच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या कामात वाढ झाली असल्याने नव्याने ३१६५ तलाठी भरती केली असून मनुष्यबळ वाढवून कामकाजातील अडचणी दूर करण्यातसाठी या पदांना मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ ते २०१९ या कालावधीत चार वर्षांत ही रिक्त पदे भरावयाची होती, परंतु या पदांना शासनाने मंजूरी न दिल्याने पदभरती होऊ शकली नसल्याने तलाठ्यांना अतिरीक्त गावांचा कारभार संभाळावा लागत असून शासनाकडून येणाऱ्या योजना तलाठ्यांशिवाय शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत, तसेच पदे रिक्त असल्याने विविध योजनांची कामे संथ गतीने सुरू असून परिणामी सात बारा उताऱ्याच्या संगणीकृत नोंदी आणि विविध दाखले रखडल्याने गावचा कारभार रखडला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने दरवर्षी २० टक्के प्रमाणे पदभरती करणार असल्याचे जाहिर केले असूनही तीन वर्षे पदभरती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पदभरती न होण्याची कारणे काय आहेत व पदभरती होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२२) :(१) , (२), (३) व (४) मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय दिनांक २५.०५.२०१७ अन्वये ३१६५ नवीन तलाठी साझे व ५२८ नवीन महसूल मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर तलाठी साझे व महसुल मंडळे कार्यान्वित करण्यासाठी नवीन पदे उच्च स्तरीय समितीकडून एकाच वेळी मंजूर करून घेऊन पुढील ४ वर्षात टप्प्या-टप्प्याने भरण्यासही मान्यता प्रदान केली आहे.

परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर नवीन पदनिर्मिती प्रस्ताव सप्टेंबर, २०२१ अखेरपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. तथापि, आता वित्त विभागाच्या उच्च स्तरीय समितीची दिनांक २९/४/२०२२ रोजी बैठक पार पडली असून वित्त विभाग व शासन मान्यतेने उक्त पदे निर्माण करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

तळा (जि. रायगड) येथील भूमिअभिलेख कार्यालयात रिक्त पदे भरण्याबाबत

(१०) ३९७१४ (०१-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळा (जि.रायगड) येथे नवीन तालुक्याची निर्मिती सन २०११ या कालावधीत केली असून उक्त तालुक्याच्या निर्मितीनंतर तब्बल १० वर्षानी सन २०२१ मध्ये भूमि अभिलेख कार्यालयाची स्थापना करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) सदर कार्यालयात १४ पदे मंजूर असताना सद्य:स्थितीत फक्त पाच कर्मचारी कार्यरत असून उपअधिक्षक, भूमिलेख, भूकरमापक, नगरभूमापक, प्रतिलिपी, जावक -आवक (बटवडा) लिपीक व दप्तरबंद शिपाई अशी एकूण १४ पैकी ९ पदे रिक्त असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असल्याने दुसरीकडे नागरिकांना एकेका कामासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचा वेळ व आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याचे तसेच जमीन मापणीचे पैसे भरुन देखील सहा-सहा महिने कामेच होत नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत उपअधिक्षक, भूमिअभिलेख यांनी जिल्हाधिकारी, रायगड, संचालक, भूमिअभिलेख, कोकण भवन, मुंबई व जिल्हा भूमिअभिलेख यांचेकडे रिक्त पदे भरण्याबाबत अनेकदा प्रस्ताव सादर केला आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) : (१) हे खरे नाही.

तळा या तालुक्याची निर्मीती सन १९९८ मध्ये केलेली असून उप अधीक्षक भूमि अभिलेख, तळा या कार्यालयाची निर्मीती दिनांक ०१.११.२००८ पासून करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.
उप अधीक्षक भूमि अभिलेख, तळा या कार्यालयात एकूण १४ पदे मंजूर असून त्यापैकी एकूण ८ पदे रिक्त आहेत.
(३) हे खरे नाही.
कार्यरत कर्मचाऱ्यांकडून मोजणी काम पुर्ण करुन घेतले जात आहेत. माहे मार्च २०२२ अखेर ई-मोजणीच्या संख्यात्मक अहवालानुसार ५१ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी चालु महात ३० प्रकरणांत मोजणी तारखा नेमण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित प्रकरणांपैकी १ प्रकरण सहा महावरील असून सदर प्रकरण कार्यालयीन स्तरावर प्रलंबित आहे.
(४) हे खरे नाही.
(५) भूमि अभिलेख विभागातील गट-क पदसमुह ४ संवर्गातील राज्यभरातील एकूण १०१२ रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक ९.१२.२०२१ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आला असून त्यापैकी कोकण विभागातील २४४ रिक्त पदांचा समावेश आहे.सदर भरती प्रक्रिया प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रिक्षा चालक-मालक कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

(११) ३९९२४ (०९-०४-२०२२). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील असंख्य रिक्षा चालक-मालक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक व मानसिक उन्नती घडविण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या धर्तीवर शासकीय रिक्षा चालक-मालक कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यात शासकीय रिक्षा चालक-मालक कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना व कार्यवाही केली तसेच त्याची अंमलबजावणी कधी पर्यंत करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२२-०८-२०२२) :(१) होय.
(२) रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी कल्याण मंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.१०.२०२१ रोजी बैठक पार पडली. या बैठकीमध्ये प्रवासी व मालवाहतूक चालक, वाहक यांच्याकरिता स्वतंत्र असंघटीत कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात आली. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र कृषि औद्योगिक महामंडळाच्या ,रत्नागिरी किंवा अन्य विभागीय कार्यालयामध्ये विक्री प्रतिनिधी पदाची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव

(१२) ४०५३० (०१-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र कृषि औद्योगिक महामंडळाच्या रत्नागिरी किंवा अन्य विभागीय कार्यालयामध्ये विक्री प्रतिनिधी पदाची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदाची नियुक्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी कृषि मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ एप्रिल,२०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अब्दुल सत्तार (०९-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) लोकप्रतिनिधींचे दिनांक २२/०४/२०२१ चे पत्र प्राप्त झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवून विमा योजनेच्या लाभार्थी निकषात सुधारणा करुन शेतमजूरांना अंतर्भूत करण्याबाबतचा प्रस्ताव

(१३) ४०५९८ (०१-०४-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवून विमा योजनेच्या लाभार्थी निकषात सुधारणा करुन शेतमजूरांना अंतर्भूत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेतंर्गत शासनातर्फे आर्थिक मदत केली जाते त्याकरिता त्या व्यक्तीच्या अथवा कुटुंबातील सदस्यांच्या नावे शेत जमीन असणे आवश्यक आहे. परंतु या योजनेच्या निकषामध्ये शेतमजूरांचा समावेशच नसल्याने शेतमजूराशिवाय शेत करणे अशक्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवून विमा योजनेच्या लाभार्थी निकषात सुधारणा करुन शेतमजूरांना अंतर्भूत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अब्दुल सत्तार (१४-११-२०२२) : (१) हे खरेनाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) राज्यात शेती व्यवसाय करतांना शेतकऱ्यांचा मृत्यू पश्चात अथवा घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त शेतकऱ्यांस / त्यांच्या कुटुंबास लाभ देण्याकरिता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली आहे.
सदर विमा योजनेची व्याप्ती वाढवून वहितीधारक खातेदार शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही एक सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती-पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकूण दोन जणांचा समावेश करुन योजना राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडीचे तत्कालीन नायब तहसिलदार यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत

(१४) ४०८६५ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी भिवंडी, यांच्या दालनात मौजे भिवंडी सव्हे क्र.३१/२ व ३५ या जमिन मिळकतीचे आरटीएस दावा क्र.२४७/२०२१ प्रमाणे केस चालू असून सदर दाव्यामध्ये ३५ वर्षापूर्वी तहसिलदार यांनी ७० ब चे जे आदेश दिले होते, ते आदेश कनिष्ठ अधिकारी तत्कालिन नायब तहसिलदार यांनी रद्द करुन कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर प्रकरणाबाबत दाव्यामध्ये तत्कालिन नायब तहसिलदार यांनी गैरव्यवहार करुन कायदयाचे उल्लंघन केल्याने त्यांची चुक दुरुस्ती म्हणून उपविभागीय अधिकारी,भिवंडी यांनी तात्काळ विलंब न करता गुणवत्तेच्या आधारावरती निर्णय घेणे आवश्यक असल्याचे तहसिलदार कार्यालयातील अधिका-यांनी केलेल्या चुकांसाठी शेतक-यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे, त्याचे काम सुलभ व चुकीची सुधारणा होण्यासाठी वेळोवेळी शेतकरी महिलेने अपिल दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी तत्कालिन तहसिलदार यांचे ३० वर्षापूर्वीचे टेनेन्सीचे आदेश झुगारुन संबंधित नायब तहसिलदार यांनी तहसिलदार यांचे टेनेन्सी कायदयाखाली दिलेले आदेश अनियमित रद्द करुन वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने कनिष्ठ अधिका-यांवर कारवाई करुन सबंधित शेतकरी महिलेस शासन न्याय देणार का तसेच अशा महसूल खात्यातील वरिष्ठ अधिका-यांचे आदेश कनिष्ठ अधिकारी परस्पर गैरव्यवहाराच्या माध्यमातून बदलत असल्याने त्यांच्यावरती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-११-२०२२) : (१) व (२) अशा स्वरुपाची तक्रार/अपील दाखल केल्याचे आढळून आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मौजे भिवंडी येथील फेरफार क्र. ५४० व ९९० संदर्भात उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे अपील क्र २४७/२०२१ दाखल करण्यात आले होते.

उपरोक्त अपीलाच्या अनुषंगाने झालेल्या चौकशी दरम्यान दि.०२/०३/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदरहू अपीला मध्ये अंतीम निर्णय झाला असून दिनांक ०२ मार्च,२०२२ रोजीच्या आदेशान्वये अपील फेटाळण्यात आले आहे
(३) तक्रारीमध्ये तथ्य आढळून न आल्याने संबंधीतां विरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा भंगाराम तळोधी (ता.गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर) येथील तहसीलदार यांनी वनपट्टाधारक आदिवासींच्या जमिनी वीज महावितरणाला दिल्याबाबत

(१५) ४११०८ (०५-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा भंगाराम तळोधी (ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर) येथील भूमिहीन आदिवासी शेतकरी कै.फरीदा वकटू मेश्राम यांना १.०१ हे.आर जमीन शेतीकरिता मामला क्र.१२५९ / एल.एन.डी -३९/७८-७९ द्वारे २ जून १९७९ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी शेत सर्व्हे नंबर ४०५/१ चा प्रत्यक्ष वनपट्टा दिला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कै. फरीदाच्या वारसांना कोणत्याही प्रकारची माहिती नसतांना तहसीलदार गोंडपिंपरी यांनी सर्व्हे नं.४०५/१ चे हिस्से करुन भूखंड क्र.६८८ आराजी ०.८१ हे. आर.आणि भूखंड क्र.११७४ आराजी ०.४० हे आर असे जमिनीचे दोन हिस्से करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, दस्तऐवजाची पडताळणी न करता वनपट्टाधारक आदिवासींच्या जमीनीची विभागणी करुन विज महावितरण कंपनीला दीड एकर जागा देण्यात आली, तसेच वारसांनी महावितरण कंपनीला खोदकाम करण्यास विरोध केला असता तहसीलदार यांच्या आदेशानुसार पोलीस बळाचा वापर करुन कल्पना मेश्राम यांचेवर गुन्हे दाखल करण्यात आले, तसेच ही जमीन गरीब आदिवासी कुटुंबाला परत देऊन न्याय देण्याबाबत व परस्पर जमिनीचे तुकडे पाडणा-या तहसीलदार व तलाठ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही. मौजा भंगाराम तळोधी ता.गोंडपिंपरी, जि.चंद्रपूर येथील कै.फरीदा वकटू मेश्राम यांना वनपट्टा देण्यात आला नसून जागेचा अस्थायी पट्टा देण्यात आला आहे. तसेच सदर जमिनीचे हिस्से करण्यात आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये सैनिक (जवान) यांचा समावेश करण्याबाबत

(१६) ४२००० (०६-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत अपघातामुळे मृत्यू ओढवल्यास किंवा अपंगत्व आल्यास शासनातर्फे अर्थसहाय्य देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत सर्व शासकीय कर्मचारी समाविष्ट असून सैनिक (जवान) यांचा समवेश नसल्याने त्यांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सैनिक (जवान) यांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत सैनिक (जवान) यांचा समावेश करण्याबाबतचे मा. ॲड. राहूल कुल, विधान सभा सदस्य यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने मा. सदस्यांना प्रकरणाची वस्तुस्थिती दि. २१.०६.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील भूमि अभिलेख विभागातील रिक्त असलेल्या पदावर कायम अधिकाऱ्याची नेमणुक करण्याबाबत

(१७) ४२४६० (०७-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागातील रिक्त असलेल्या पदावर कायम अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक ०५ फेब्रुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख या पदावर परभणी येथील अधिकाऱ्यास तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार देण्यात आला आहे, तसेच कळंब उप अधिक्षक भूमि अभिलेख यांच्याकडेही इतर तीन तालुक्याचा पदभार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळंब उप अधिक्षक भूमि अभिलेख यांच्याकडेही इतर तीन तालुक्याचा पदभार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अधिकारी कार्यालयात पुर्ण वेळ नसल्यामुळे जिल्हयातील अनेक मोजणीची कामे, क्षेत्र दुरुस्तीची कामे,दस्त / नाव नोंदविणे, तसेच मृतांच्या वारसाची नांवे लावणे असे अनेक नागरिकांची कामे प्रलंबित राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उस्मानाबाद जिल्हा हा आकांक्षीत जिल्हयापैकी एक असल्याने तेथील नागरिकांच्या समस्या सोडवून येथील विकास साधण्यास प्राधान्य मिळाण्यासाठी रिक्त असलेल्या विविध पदावर पूर्ण वेळ कायम अधिकाऱ्याची नेमणुक करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यावही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) भूमि अभिलेख विभागातील उप अधीक्षक भूमि अभिलेख या गट-ब संवर्गातील सरळसेवेने व पदोन्नतीने पदे भरली जातात. सरळसेवेच्या रिक्त पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करणेत आलेले आहे. तसेच पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील असंघटीत यंत्रमाग कामगारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याच्या शासन निर्णयाबाबत

(१८) ४२४९६ (१२-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे साडेनऊ लाख यंत्रमागाशी निगडीत असलेल्या साडेचार लाख असंघटीत कामगारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी यंत्रमाग कामगार व कामगार संघटनेतर्फे शासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीस अनुसरुन कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली यंत्रमाग मालक संघटना व कामगार संघटनांचे प्रतिनिधी, वस्त्रोद्योगातील तज्ञमंडळी तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांच्यासमवेत माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत बांधकाम कामगार महामंडळाचे धर्तीवर, यंत्रमाग कामगारांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास प्रसार माध्यमातून घोषित केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१८-०८-२०२२) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) तत्कालिन मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत, यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

मुक्ताईनगर, रावेर व बोदवड या तीन तालुक्यांमधील रावेर व मुक्ताईनगर येथे भूमि अभिलेख या विभागात कर्मचारीवर्ग अपुरे असल्याबाबत

(१९) ४३१७४ (०७-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर, रावेर व बोदवड या तीन तालुक्यांमध्ये रावेर व मुक्ताईनगर येथे भूमि अभिलेख विभागात कर्मचारी वर्ग अपुरे असल्यामुळे जागा मोजणी, शेती मोजणी, व्यवहारातील प्लॉट मोजणी यासाठी कर्मचा-यांची संख्या पर्याप्त नसल्याने अनेक वेळा वादाचे प्रसंग निर्माण होतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे भूमि अभिलेख विभागात आवश्यक तो कर्मचारी वर्ग देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) उप अधीक्षक भूमि अभिलेख, मुक्ताईनगर, रावेर, बोदवड या कार्यालयांमध्ये प्राप्त मोजणी प्रकरणे व शिल्लक मोजणी

प्रकरणे पहाता, कार्यरत असलेली भूकरमापकांची पदे ही शिल्लक असलेल्या मोजणी प्रकरणांचा निपटारा करणेकामी पुरेशी आहेत. त्यामुळे अन्य कार्यालयातून कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

"मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना"यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करण्याबाबत

(२०) ४३१९१ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना" राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याप्रवण १४ जिल्हे, ०३ नक्षलग्रस्त जिल्हे अशा १७ जिल्ह्यातील सर्व तालुके तसेच, उर्वरीत महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना राज्यातील उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये राबविण्यासाठी शासनाने दिनांक १८ नोव्हेबंर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाने मान्यता दिली आहे तसेच मराठवाड्यातील मागास व आत्महत्याग्रस्त शेतकरी बीड जिल्ह्याच्या शासन आदेशामध्ये नाव नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, "मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना" मध्ये मागास, उसतोड मजूर, शेतकरी आत्महत्याग्रस्त व सिंचनाची व्यवस्था नसलेल्या बीड जिल्ह्याचा समावेश करून येथील शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) : (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.
दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये औरंगाबाद महसूल विभागातील सर्व तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना ही संपूर्ण औरंगाबाद विभागात राबविण्यात येत असून सदरहू योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश आहे.
(४) व (५) हे खरे आहे.
मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश असल्याचे सन्माननीय सदस्यांना दिनांक १३ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे एरंडोल, (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील भूमिअभिलेख कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या नागरीकांना कार्यालयामार्फत उद्भवणा-या समस्यांबाबत

(२१) ४३३७९ (०७-०४-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे एरंडोल (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील भूमिअभिलेख कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या नागरीकांना कार्यालयामार्फत उद्भवणाऱ्या समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनाक.०६ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांच्याकडे लेखी निवेदनादवारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखी निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, जळगांव यांनी दिनांक १२ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास उपअभियंता भूमि अभिलेख कार्यालयाला भेट दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) : (१) व (२) खरे आहे.
(३) उप अधीक्षक भूमि अभिलेख, एरंडोल कार्यालयाकतील परिरक्षण भूमापक शहर एरंडोल व परिरक्षण भूमापक कासोदा हि दोन्ही पदे रिक्त असलेने अन्य कर्मचाऱ्यांकडे पदभार हस्तांतरीत करून माहे डिसेंबर २०२१ अखेर प्राप्त प्रलंबित असलेली बारनिशी प्रकरणे, फेरफार प्रकरणे, भसंपादन प्रकरणे, मोजणी प्रकरणे प्राथाम्याने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, उपलब्ध सर्व व प्रतिनियुक्त कर्मचारी यांच्या सेवा प्रभावीपणे वापरुन प्रलंबित कामकाजाचा निपटारा विहित परिमाणात करणेची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भूमि अभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२२) ४३४५९ (०७-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुमि अभिलेख कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ६ जानेवारी,२०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मतदार संघातील उप भूमि अभिलेख कार्यालयातील सुमारे ५० टक्के पदे रिक्त असल्यामुळे खांडकरी शेतकरी जमिन वाटपामुळे व इतर जमिन मोजणीच्या कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने अद्यापपर्यंत रिक्त पदे भरण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
उप अधीक्षक भूमि अभिलेख, माळशिरस कार्यालयातील एकूण -२८ मंजूर पदे असून त्यापैकी १६ पदे कार्यरत असून १२ पदे रिक्त आहेत.
उक्त रिक्त पदामुळे उप अधीक्षक भुमि अभिलेख, माळशिरस यांच्या कार्यालयात खांडकरी शेतकऱ्यांची मोजणी प्रकरणे - १७, तसेच अन्य सर्व प्रकारचे एकूण ६१२ मोजणी प्रकरणे शिल्लक आहेत.
(३) व (४) उपसंचालक भुमि अभिलेख, पुणे यांचेकडील दिनांक २२/०४/२०२२ रोजीच्या पदोन्नती आदेशान्वये उप अधीक्षक भुमि अभिलेख, माळशिरस कार्यालयातील निमतानदार या एका पदावर व परिरक्षण भूमापक या दोन पदांवर नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत.
तसेच गट क पदसमूह ४ मधील भूकरमापक तथा लिपीक संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरणेकामी दिनांक ९/१२/२०२१ रोजी सरळसेवा भरतीची जाहिरात प्रसिध्द करणेत आली असून त्यानुसार सदर भरती प्रकियेची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रब्बी हंगामाचा कालावधी १ डिसेंबर ते ३१ मार्च असा करण्याबाबत

(२३) ४३५१४ (०१-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रब्बी हंगाम १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीचा असतो. परंतु आता पावसाळा उशिरा सुरु होऊन शेती व मशागतीची कामेही उशिरा सुरु होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रब्बी हंगामाचा कालावधी १ डिसेंबर ते ३१ मार्च असा करण्यात यावा व रब्बी हंगामासाठी पाण्याचे आर्वतन देण्याचे नियोजन करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने राज्यात रब्बी हंगामाचा कालावधी १ डिसेंबर ते ३१ मार्च असा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :(१) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे दिनांक ११.०१.२०१८ व दिनांक ३०.०३.२०२२ अन्वये जल प्रशुल्क आकारणी संदर्भातील आदेशात कोकण व विदर्भ करीता रब्बी हंगाम कालावधी १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च तसेच कोकण व विदर्भ व्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्र करीता १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी असा निर्धारीत केला आहे.
(२) अशंत: खरे आहे.
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर अंतर्गत अमरावती विभागात उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती या कार्यालयास या वर्षी रब्बी हंगामात अवकाळी पावसामुळे उशीरा पेरणी झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीतील पिकांना पाणी मिळण्यासाठी दर वर्षी प्रमाणे १५ मार्च २०२२ ऐवजी ३१ मार्च २०२२ पर्यंत पाणी सोडण्यात यावे अशी शेतकऱ्यांकडून मागणी प्राप्त झाली
(३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे दिनांक ११.०१.२०१८ व दि.३०.३.२०२२ च्या जल प्रशुल्क आकारणी संदर्भातील आदेशानुसार विदर्भ व कोकण करीता रब्बी हंगाम कालावधी १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च असा निर्धारित केलेला आहे. विदर्भ व कोकण व्यतिरिक्त उर्वरीत महाराष्ट्र करीता रब्बी हंगाम कालावधी १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी असा आहे. सदर मागणी प्राप्त असलेल्या विदर्भ भागात रब्बी हंगाम कालावधी १५ नोव्हेंबर ते ३१ मार्चअसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रधानमंत्री पिकवीमा योजनेखाली शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(२४) ४३५६२ (०७-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री पिकविमा योजना खरीप हंगाम २०२१-२२ अंतर्गत हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत नुकसान भरपाई निश्चित करणे, या तरतुदीनुसार लातूर जिल्ह्यातील ६० अनुसूचीत विमा क्षेत्र घटकातील सोयाबीन या अधिसूचित पिकाचे प्रतीनिधिक सुचकाच्या आधारे अपेक्षित उत्पन्न हे त्या पिकाच्या सरासरी उत्पन्नाच्या ५०% पेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे नुकसान भरपाई पात्र असल्याचे विनिर्दिष्ट करीत जिल्हाधिकारी, लातूर यांनी सोयाबीन या पिकासाठी नुकसान भरपाई रकमेच्या २५% आगाऊ रक्कम विमाधारक शेतकऱ्यांना देण्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनी लि. मुंबई स्टॉक एक्स्चेंज टावर्स यांना आदेशाची अधिसूचना दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील आदेशानुसार औसा विधानसभा मतदारसंघातील अधिसूचित महसूल मंडळ गटातील विमाधारक शेतकऱ्यांना या अधिसूचनेनुसार २५% आगाऊ पिकविमा नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सन २०१९ ते आजतागायत जिल्हाधिकारी लातूर यांच्या आदेशाची अमंलबजावणी न केल्याप्रकरणी विमा कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी लातूर कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली असून त्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री यांनी जिल्हाधिकारी लातूर यांना दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे हंगामातील प्रतिकुल परिस्थिती या बाबी अंतर्गत ज्या महसूल मंडळातील पिकांची सरासरी उत्पादनात ५० टक्केपेक्षा अधिक घट आढळून आली, ती महसूल मंडळे मदतीस पात्र ठरली. उर्वरित महसूल मंडळे ही अपात्र ठरतात.
(३) हे खरे आहे.
(४) हंगामातील प्रतिकुल परिस्थितीमुळे होणारे नुकसान या बाबी अंतर्गत सोयाबीन या पिकाकरीता औसा विधानसभा मतदार संघातील महसूल मंडळांचे अपेक्षित उत्पन्न हे सरासरी उत्पन्नाच्या ५० टक्के पेक्षा जास्त आल्याने ही मंडळे नुकसान भरपाई पात्र ठरली नाहीत. लातूर जिल्हयात सोयाबीन पिकाकरीता ६० महसूल मंडळासाठी अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती. तथापि, त्यापैकी ५१ महसूल मंडळाचे अपेक्षित उत्पन्न हे सरासरी उत्पन्नाच्या ५० टक्के पेक्षा जास्त आल्याने योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नुकसान भरपाई देय झाली नाही. उर्वरीत ९ महसूल मंडळातील ७९८२५ शेतकऱ्यांना रक्कम रु. ३६.३६ कोटी विमा कंपनी मार्फत निश्चित करण्यात आले असून त्यापैकी ७८६२४ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ३६.२७ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ११६ वर्षे जुनी इमारत धोकादायक असल्याबाबत

(२५) ४३६०० (०७-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ११६ वर्षे जुनी इमारत धोकादायक असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत जुनी झाल्याचे २००६ मध्ये घोषीत करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन इमारतीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) नागपूर शहरातील महाराज बाग परिसरातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत नागपूर कृषि महाविद्यालयाची इमारत ही राज्य शासनाच्या "संरक्षीत वास्तु (हेरिटेज)" मध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे या इमारतीच्या दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाची मान्यता घेणे आवश्यक ठरते. यासंदर्भात नागपूर येथील पुरातत्व विभागाकडे अकोला कृषि विद्यापीठामार्फत संर्पक करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, सदर इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडे निधी वितरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत नागपूर कृषि महाविद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव अकोला कृषि विद्यापीठाने सादर केलेला आहे. त्यानुसार नागपूर कृषि महाविद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दवलामेटी (ता. हिंगणा, जि. नागपूर) नं. ७९ व हेटी येथील नागरीक सुमारे ३५ ते ४० वर्षापासून वास्तव्यास असून या भागात पट्टे वाटप न झाल्याबाबत

(२६) ४३६०९ (०७-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दवलामेटी (ता.हिंगणा, जि. नागपूर) खसरा नं. ७९ व हेटी येथील नागरीक सुमारे ३५ ते ४० वर्षापासून वास्तव्यास असून या भागात शासकीय अर्थसहाय्याने विविध विकास कामे झाले असून नागरीकांना पट्टे वाटप न झाल्याचे माहे नोंव्हेबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवलामेटी ख.न. ७९ व हेटी या भागातील नागरीकांना शासनाने पट्टे वाटप् करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-११-२०२२) : (१) व (२) मौजा दवलामेटी प.ह.न. ५- अ येथील सर्व्हे नंबर ७९ आराजी ६.८२ हे. आर. चे ७/१२ वर महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास खाते अशी नोंद दिसून येते, मौजा उकडवाही (हेटी) अंतर्गत हेटी गावामधील सर्व्हे क्रमांक ९२,९३ आराजी ०.२४, ०.४० हे. आर. सदर जमीनीचे अभिलेखात इतर अधिकारामध्ये नि.प.नों.प्र झु.जं. असुन खातखुडा टाकण्याकरीता हक्क असल्याची नोंद दिसून येते. सदर गट क्रमांकांस वन संवर्धन अधिनियमातील तरतुदी लागू होतात.

मोजा दवलामेटी भोगवटादार सदरी महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास खाते अशी नोंद असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोनाने मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

(२७) ४३८२५ (०७-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या अपघातकालीन मदतीसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली असून, ७/१२ धारक शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना याचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये कोरोनामुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करून या योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाच्या वतीने दिनांक ४ जून २०२१ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१६-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत कोरोनामुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करून त्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबतची मा. श्री. राजेंद्र राऊत, विधानसभा सदस्य व मा. श्री. प्रविण पोटे पाटील, विधानपरिषद सदस्य यांची निवेदने प्राप्त झाली आहेत.

उपरोक्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. सदस्यांना प्रकरणाची वस्तुस्थिती दिनांक २१.०६.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील गावांना महसुली दर्जा प्राप्त करून देण्याबाबत

(२८) ४३८३६ (०७-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) विधानसभा मतदार संघातील मौजा सावंगा पुन (ता. आष्टी) येथील एकुण लोकसंख्या ५०३ असून मौजा मानिकनगर (ता. आष्टी) येथील लोकसंख्या ६०० तसेच ग्रा.प. आजणगांव अंतर्गत मौजा जांभुळदरा (ता. आर्वी) येथील लोकसंख्या २५० एवढी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांना महसुली दर्जा अजुन पर्यंत प्राप्त नसल्याने या ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या विविध योजना लागू असतानाही तेथील नागरिकांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचीत राहावे लागत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर गावांना महसुली दर्जा प्राप्त करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) : (१) (२) व (३) जनगणना २०११ नुसार मौजा सावंगा पुनर्वसन (ता. आष्टी) या गावाची लोकसंख्या ५०६, माणिकनगर (ता. आष्टी) या गावाची लोकसंख्या ५१४ व आर्वी तालुक्यातील जांभुळदार या् गावाची लोकसंख्या १९१ एवढी आहे.

मौजा माणिकनगर, ता. आष्टी व मौजा सावंगा या गावास महसुली दर्जा प्राप्त आहे. तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४ मधील विषद तरतुदीनुसार मौजा जांभुळदरा ता. आर्वी या गावाची लोकसंख्या निकषामध्ये बसत नसल्याने महसूली दर्जा प्राप्त झालेला नाही.

तथापि, उपरोक्त नमुद सर्व गावांना महसूल विभागाकडील विविध योजनांचे लाभ देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य मागसवर्ग आयोगाचे नव्यान गठन करण्यातबाबत

(२९) ४४५८६ (२३-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मागसवर्ग आयोगाचे नव्यान गठन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आयोगामार्फत मराठा समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास केला जाईल असा निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा मराठा आरक्षण विषयक मंत्री मंडळ उपसमितीच्या अध्यक्षांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,तसेच अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अतुल सावे (१४-११-२०२२) : (१), (२) व (३) सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्षांची नियुक्ती शासन अधिसूचना दिनांक ०३/०३/२०२१ अन्वये करण्यात आली. तसेच, शासन अधिसूचना दिनांक १५/०६/२०२१ अन्वये सदर आयोगाची सदस्यांची नामनिर्देशित पध्दतीने निवड करण्यात आली.

तथापि, मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची माहिती संकलित करण्यासाठी/ अभ्यास करण्यासाठी एका नवीन आयोगाची स्थापना करण्याबाबत कायदेशीर बाबी विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येत आहे. विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय अद्याप अप्राप्त असून ते प्राप्त झाल्यानंतर नवीन मागासवर्ग आयोग गठीत करण्याबाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

जमिन खरेदी विक्रीवर मुद्रांक शुल्क (स्टँम्प ड्युटी) आकारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मूल्यदर तक्ता (रेडी रेकनर) दरामध्ये वाढ झाल्याबाबत

(३०) ४४६३९ (०६-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमिन खरेदी, खरेदी-विक्रीवर मुद्रांक शुल्क (स्टॅम्प डयुटी) आकारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मुल्य दर तक्ता (रेडी रेकनर) मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत राज्यात सरासरी ५ टक्के वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रात रेडी रेकनेरमध्ये किती टक्के वाढ करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर वाढ करण्यात आल्यामुळे किती जमिन खरेदी-विक्रीची प्रकरणे यामध्ये समाविष्ट आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) महानगरपालिका क्षेत्रात रेडी रेकनरमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे:-

मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी सन २०२२- २३ मधील सरासरी वाढ २.३४% तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रासाठी सन २०२२-२३ मधील सरासरी वाढ ८.८०% करण्यात आली आहे.

(३) सन २०२२ मध्ये जमिन खरेदी विक्रीची दस्त नोंदणी संख्या एकूण ७७५१५९ इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, (ता. हवेली) आंबेगाव व बुद्रुक येथे सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने अनधिकृत गौणखनिज उत्खनन झाल्याबाबत

(३१) ४४७२१ (०४-११-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव व बुद्रुक (ता. हवेली, जि.पुणे) येथील सर्व्हे/गट नं.६/४, ६/५, ६/६, ६/७, ६/८, ६/१२, ६/१३, ६/१४ व ६/१५ मध्ये सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पात विकासकाने अनधिकृत गौणखनिज उत्खनन केले असल्याचे माहे एप्रिल, मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित विकासकास दिनांक ११ मार्च ते एप्रिल ११ पर्यंत ९०० ब्रास उत्खनन करण्याचा परवाना असताना मुदत संपल्यानंतरही अवैधपणे उत्खनन सुरु असताना संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभागाचे संबंधित अधिकारी विकासकाला पाठीशी घालत असल्याने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१), (२), (३) व (४) मौजे आंबेगाव व बुद्रुक (ता. हवेली, जि.पुणे) येथील सर्व्हे/गट नं.६/४, ६/५, ६/६, ६/७, ६/८, ६/१२, ६/१३, ६/१४ व ६/१५ या क्षेत्रामध्ये इमारत बांधकाम करणाऱ्या विकासकास तहसिलदार,हवेली यांनी दिनांक १२.०६.२०२० च्या आदेशान्वये २८८ ब्रास व उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी दिनांक २५.०८.२०२१ च्या आदेशान्वये ६०० ब्रास साठी तात्पुरते गौण खनिज परवाने देण्यात आले. गाव कामगार तलाठी यांनी दिनांक १३.०१.२०२२ स्थळपाहणी अंती परवानगी पेक्षा जादा १०० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबतचा अहवाल तहसिलदार, हवेली यांना सादर करण्यात आला असता, तहसिलदार, हवेली यांनी विकासक यांना अनाधिकृत जादा उत्खननाबाबत महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये दंडाची नोटीस

बजाविण्यात आली आहे.

तद्नंतर सदर क्षेत्रासाठी उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी दिनांक ०१.०२.२०२२ व दिनांक ११.०३.२०२२ च्या आदेशान्वये एकुण १८०० ब्राससाठी तात्पुरते गौण खनिज परवाने देण्यात आले. गाव कामगार, तलाठी यांनी सदर क्षेत्राबाबत केलेल्या दिनांक ०८.०७.२०२२ च्या पंचनामानुसार सदर क्षेत्रात गौण खनिजाचे परवान्यापेक्षा जास्तीचे गौण खनिज उत्खनन झाले नसल्याचे उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी अहवालात नमुद केले आहे.

पुणे, शहरात बनावट एनए ऑर्डर आणि भोगवटा पत्र बनवून शेकडो सदनिकांची नोंदणी करून घेतल्याबाबत

(३२) ४४७९३ (२८-०६-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात बनावट एनए ऑर्डर आणि भोगवटा पत्र बनवून शेकडो सदनिकांची नोंदणी करून घेतल्याचा गैरप्रकार माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६७ बनावट एनए ऑर्डर तसेच ३७ बनावट भोगवटा पत्र अशा सुमारे १०० हून अधिक केसेस तपासणीत आढळून आल्या असून ही संख्या हजारोंच्या जवळपास आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील तपासणीचे काम संथ गतीने सुरु असल्यामुळे अशा गैरप्रकारांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तपासणीचे काम सत्वर करण्याबाबत तसेच दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

सह दुय्यम निबंधक,हवेली क्र.३ या कार्यालयात नियमितीकरण दाखला, भोगवटा प्रमाणपत्र , 'क' अकृषक दाखला इ.बनावट कागदपत्रे जोडून दस्त नोंदणी केली असल्याबाबत ९९ दस्तांमध्ये सांशकता निर्माण झाली असल्याची तक्रार दिनांक २१.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

नोंदणी उपमहानिरीक्षक,पुणे यांनी त्यांच्या दिनांक १२.४.२०२२ व दिनांक २५.५.२०२२ च्या पत्रान्वये ज्या दस्तांमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर झाला आहे, त्या सर्व दस्तांमध्ये कलम ८२ व कलम ८३ प्रमाणे उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच पुणे शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मागील २ वर्षातील नोंदविण्यात आलेल्या दस्तांमध्ये जोडण्यात आलेले एन.ए.आदेश/भोगवटा प्रमाणपत्र /रेरा प्रमाणपत्र /गुंठेवारी नियमितीकरण दाखला, 'क' प्रत किंवा इतर कोणत्याही परवानग्या, ना-हरकत प्रमाण इ.ची बारकाईने पडताळणी करुन व सदर कागदपत्रे बनावट असल्याची साशंकता असल्यास, संबंधित प्राधिकारणाकडून सत्यता पडताळून ज्या दस्तांमधील कागदपत्रे बनावट असल्याचे आढळून येईल, त्या सर्व दस्तांच्या बाबतीत नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व कलम ८३ अन्वये योग्य कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र क्र. का.४/प्र.क्र.१३८/२२/११४३,दिनांक १४.७.२०२२ अन्वये सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर यांना सदर प्रकरणात त्वरीत व्यक्तीश: पाठपुरावा करुन बनावट प्रमाणपत्र जोडून नोंदणी झाल्याचे सिध्द झालेल्या सर्व दस्तांच्या बाबतीत तातडीने गुन्हे नोंद करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) सत्यता पडताळणीसाठी पाठविण्यात आलेल्या दस्तांपैकी २६ दस्तांचे बाबतीत संबंधित प्राधिकरणाकडून अहवाल प्राप्त झाला असून, २६ दस्तांमध्ये बनावट/खोटी कागदपत्रे असल्याचे निदर्शनास आले असून बनावट कागदपत्रे निदर्शनास आलेल्या २६ दस्तांपैकी १२ दस्तांचे बाबतीत नोंदणी अधिनियमामधील कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत दुय्यम निबंधक यांनी पोलीसांशी पत्रव्यवहार केला आहे. त्यापैकी ७ दस्तांच्या बाबत पोलीसांनी ३ गुन्हे FIR No.२२४,

FIR No.२२५ व FIR No.२२९ दिनांक ०५/०३/२०२२ रोजी नोंद केले आहेत.

उर्वरित दस्तऐवजासंदर्भात गुन्हे नोंद करण्याबाबतची कार्यवाही नोंदणी महानिरीक्षक कार्यालयामार्फत चालू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

संगमनेर (जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्यांच्या पीक विमा योजनेच्या निधीचा केलेला गैरवापर

(३३) ४५१४४ (२८-०६-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) शहरातील तहसील कार्यालयाच्या आवारात असलेल्या केंद्र चालकाने सन २०१७ ते २०२१ या कालावधीत अनेक शेतकऱ्यांकडून पीक विम्याकरिता पैसे घेऊन बनावट पावत्या देऊन कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, संबंधित प्रकरणी तालुका कृषी अधिकारी व तहसीलदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करुन अद्यापही केंद्र चालकावर गुन्हा दाखल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१८-२०१९ या कालावधीतील रब्बी हंगामात सदर सेवा केंद्रात जवळे कडलग (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) येथील डाळिंब उत्पादक शेतकऱ्याने रोख रक्कम भरुनही शेतकऱ्याला विमा नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना विम्याची नुकसान भरपाई मिळण्याकरिता तसेच संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१७-०८-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेतंर्गत आंबिया बहार (रब्बी हंगाम) सन २०१८-१९ मध्ये ६२, मृग बहार (खरीप हंगाम) २०१९ मधील ६ अशा एकूण ६८ शेतकऱ्यांकडून पिक विमा हप्त्याची रक्कम घेऊन बनावट पिक विमा पावत्या देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत तक्रार तालुका कृषि अधिकारी, संगमनेर यांचेकडे करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

तालुका कृषि अधिकारी, संगमनेर यांनी संबंधित आपले सरकार सेवा केंद्र चालक श्री.प्रविण सुधाकर ताजणे व श्री.प्रसन्न गोरे, संगमनेर यांचे विरुद्ध प्रथम खबर क्रमांक ०५६३ अन्वये संगमनेर शहर पोलिस स्टेशन, तालुका संगमनेर जि. अहमदनगर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला.

(३) होय, हे खरे आहे.

(४) पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार शेतकऱ्यांना देय नुकसान भरपाईची रक्कम संबंधित सेतू सुविधा केंद्र चालक यांनी शेतकऱ्यांना देण्याबाबत आदेश देण्यात आले आहे. तसेच संबंधित आपले सरकार सेवा केंद्र चालका विरुद्ध प्रथम खबर क्रमांक ०५६३ अन्वये संगमनेर शहर पोलिस स्टेशन, तालुका संगमनेर जि. अहमदनगर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधितांचा CSC (ID क्रमांक ५८५४०५६१००१८) आपले सरकार परवाना कायम स्वरूपी बंद करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या कृषी आयुक्तालयांतर्गत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी घावटे समितीचा अहवाल जाहीर करण्याबाबत

(३४) ४५२७० (२८-०६-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी आयुक्तालयाअंतर्गत खते,बियाणे, किटकनाशके, उद्योगांची परवाना पत्रे दाबून ठेवल्याप्रकरणी झालेल्या गैरव्यवहारामध्ये तत्कालीन गुणनियंत्रण सेवानिवृत्त संचालक तसेच मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, मुख्य बियाणे निरिक्षक, प्रयोगशाळा उपसंचालक आणि खत परवाना विभागाचे तंत्र अधिकारी यांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराबाबत माजी लोकप्रतिनिधी, खासदार यांनी शासनाकडे तक्रारी करुन तसेच त्यानंतर शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी कृषी आयुक्तालयासमोर आंदोलने करुन त्याबाबत श्री.विजयकुमार घावटे यांचा याप्रकरणी झालेला गैरव्यवहार व गुणनियंत्रण विभागाची संपूर्ण कार्यपध्दतीचा शोध घेण्यासंदर्भात चौकशी समिती नेमली होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घावटे समितीने गुणनियंत्रण विभागातील आर्थिक घोटाळा करणाऱ्या अधिकाऱ्यांची भुमिका, सुधारणा आणि कार्यपध्दती याबाबत सादर केलेला अहवाल जाहीर न करता शासनाच्या कृषी आयुक्त कार्यालयात दडपून ठेवण्यात आलेला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरचा अहवाल जाहीर करण्याबाबत व संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१५-११-२०२२) : (१) परवाना देताना होत असलेल्या अडवणूकीबाबत सन २०१९ मध्ये तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) सन २०१९ मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी तत्कालीन कृषि संचालक श्री. घावटे यांचे अध्यक्षतेखाली सन २०१९ मध्ये चौकशी समिती नेमली होती.

(३) हे खरे नाही.

(४) तत्कालीन संचालक श्री. घावटे यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तथ्य आढळल्यास संबंधितांवर कार्यवाही करुन अहवाल सादर करण्यास आयुक्त (कृषि) पुणे यांना कळविण्यात आले आहे. तसेच, सद्य:स्थितीत बियाणे, किटकनाशके, खते या निविष्ठांचे परवाना ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत आहेत. शासनाच्या कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांचेशी संपर्क न ठेवता ऑनलाईन स्वरुपात अर्ज करुन, ऑनलाईन परवाना प्राप्त होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अवैध पद्धतीने मोबाईल ॲपच्या माध्यमातून कर्ज वितरण करणाऱ्या वित्तीय संस्थांवर कारवाई करण्याबाबत

(३५) ४५७३२ (३१-१०-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही नोंदणीशिवाय अवैध पद्धतीने मोबाईल ॲपच्या माध्यमातून कर्ज वितरण करणाऱ्या व नंतर ग्राहकांना ब्लॅकमेलिंग करत वसुली करणाऱ्या तब्बल १०० मोबाईल ॲपवर कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबाईल ॲपद्वारे जरी कर्ज वितरण होत असले तरी त्यामागच्या तांत्रिक रचनेमध्ये पेमेंट गेट-वे सुविधा देणाऱ्या कंपन्या, बिगर बँकिंग वित्तीय संस्था यांचा प्रामुख्याने समावेश असतो, त्यामुळे मोबाईल ॲप कंपन्या आणि त्यांच्या मागील तंत्रज्ञान सेवा देणाऱ्या कंपन्या अशा दोन्ही घटकांना ईडीने ई-मेलद्वारे नोटिसा जारी करत तातडीने कर्ज वितरण बंद करण्याचे सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी ज्या नागरीकांना ब्लॅकमेल करत वसुली करण्याऱ्या मोबाईल ॲप प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाच्या सायबर गुन्हे शाखेकडे अशा फसवणुकीच्या घटनांच्या किती तक्रारी दाखल झाल्या असून संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०२२) : (१) पोलिस आयुक्त, मुंबई शहर यांच्याअंतर्गत गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडून १०० मोबाईल ॲपवर कारवाई करण्याकरीता तसेच सदर ॲप्स गुगल प्ले स्टोअरवरुन काढून टाकण्याकीता CERT-in ला पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(२) ईडी या केंद्रीय यंत्रणेशी संबंधीत मुद्दा असल्यामुळे राज्य शासनाचे कोणतेही अभिप्राय नाहीत.
(३) अशा प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन घेण्यात येतो.
(४) राज्यात सन २०२२ मध्ये मोबाईल ॲपच्या माध्यमातून कर्ज वितरण करणाऱ्या आणि नंतर ग्राहकांना ब्लॅकमेलिंग करण्याप्रकरणी एकूण ८० गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हे तपासाधीन आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयात अनेक कर्मचारी मोजणीच्या नावाखाली बाहेर असल्याचे सांगून कार्यालयात अनुपस्थित असल्याबाबत

(३६) ४५८७१ (१४-११-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयात अनेक कर्मचारी मोजणीच्या नावाखाली बाहेर असल्याचे सांगून कार्यालयात अनुपस्थित रहात असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील मोजणीची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच नकाशाच्या नकलासाठीही नागरिकांना भूमी अभिलेख कार्यालयात वारंवार यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचा-यांना कार्यालयात हजर राहण्याची सक्ती करा अशी मागणी नागरिकांनी व राजकीय पक्षांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गैरहजर राहणा-या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, सोलापूर कार्यालयाचे अधिनस्त तालुक्यातील कार्यालय प्रमुख हे शिरस्तेदार, निमतानदार व भूकरमापक/लिपीक यांचे दर महाचे मोजणी/चौकशी कामाचा दौरा कार्यक्रम मंजूर करून नोटीस बोर्डावर लावतात. त्याप्रमाणे मोजणी प्रक्रिया सुरू असल्याने नागरिकांची गैरसोय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) अंशत: खरे आहे.
सोलापूर जिल्ह्यामध्ये जून, २०२२ अखेर सर्व प्रकारचे मोजणी प्रकरणे भूमापन-पालखीमार्ग, गॅस पाईपलाईन, समांतर जल वाहिनी व राष्ट्रीय महामार्ग इत्यादी मोठ्या कामाचा अतिरिक्त भार मागील दोन वर्षात पडलेला आहे.
मार्च २०२१ अखेर ४६९० प्रकरणे मोजणी करणेवर प्रलंबित होती तद्नंतर एप्रिल, २०२१ ते जून, २०२२ अखेर सर्व प्रकारची ८५८५ मोजणी प्रकरणे आवक झालेली असून त्यापैकी ६२०० प्रकरणे निकाली झालेली आहेत. जून, २०२२ अखेर ७०७५ प्रकरणे मोजणी करणेवर प्रलंबित आहेत.
मोजणी नकाशाच्या “क” प्रती सत्वर पुरविणेबाबत दरमहाच्या मासिक सभेत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) कोव्हीड-१९, रिक्त पदे व प्रमाणापेक्षा मोजणी प्रकरणांची जास्त आवक तसेच सर्व प्रथम प्राधान्य भूसंपादन मोजणी

प्रकरणी असल्यामुळे या सर्व कारणामुळे विलंब होत आहे. मात्र कर्मचारी यांचे गट तयार करून व रोव्हरचा वापर करून जास्तीत जास्त प्रकरणे निकाली करण्यात येतील.

सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील विझोरा येथील शासकीय ई क्लास जमिनीतून गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन केल्याबाबत

(३७) ४५९०७ (०१-११-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील विझोरा येथील शासकीय ई क्लास जमिनीतून समृध्दी महामार्गाच्या पॅकेज ७ चे कंत्राट घेतलेल्या रोडवेज इंडिया इन्फ्रा लि.कंपनीने मागील वर्षी ३८ हजार ९९४.२१६ ब्रास गौण खनिजाचे विनापरवानगी उत्खनन केल्या प्रकरणी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे २१.६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दंडाची रक्कम भरण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, दंडाची रक्कम न भरल्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांनी दिनांक २६.०४.२०२२ रोजी पारित केलेल्या दंडात्मक आदेशानुसार सदर कंपनीने दंडाची रक्कम ३० दिवसात भरणा न केल्यास दंडाची रक्कम त्यांचे देयकातून कपात करून शासन जमा करण्याबाबतची कार्यवाही कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शिबीर कार्यालय सिंदखेडराजा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांनी करण्यात यावी असे नमूद केले आहे.

बुटीबोरी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील एम.आय.डी.सी.तील कंपन्यादवारे बिना रॉयल्टी मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन केल्याबाबत

(३८) ४६१३९ (०४-११-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील एम.आय.डी.सी. अंतर्गत १० कंपन्याचे निर्माण कार्य सुरु असून सदर कंपन्यादवारे बिना रॉयल्टी मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन सुरु असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाराष्ट्र इन्वायरमेंन्ट पावर लिमिटेड, गोयल कंपनी, प्लास्टो कंपनी, प्रेमचंद इन्फास्ट्रक्चर, सैनी इलेक्ट्रिकल एंड इंजीनियरिंग या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार सदर अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) : (१), (२), (३) व (४) मौजा बुटीबोरी हे महसुली गाव संपूर्णत: नागपूर ग्रामीण तालुक्यात येते. परंतु, बुटीबोरी मधील एम.आय.डी.सी. चे क्षेत्र नागपूर (ग्रामीण) व हिंगणा तहसिल यामध्ये विभागलेले असून, नागपूर (ग्रामिण) व हिंगणा तहसिलदार यांच्या अहवालानुसार महाराष्ट्र इवायरमेंट पावर लिमिटेड, गोयल कंपनी, प्लास्टो कंपनी, प्रेमचंद इन्फास्ट्रक्चर, सैनी इलेक्ट्रीकल एंड इंजिनिअरींग या कंपन्यामध्ये माहे मे, २०२२ च्या सुमारास कोणत्याही प्रकारचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आलेले नाही.

गोकुळसरा (ता.धामणगाव, जि.अमरावती) येथील रेती घाटावर होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीबाबत

(३९) ४६५६० (०४-११-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुळसरा (ता.धामणगाव,जि.अमरावती) येथील एक व दोन रेती घाटातून दिवसा उत्खनन व वाहतुकीला परवाना असताना रात्री बोटीद्वारे रेतीचे उत्खनन करणाऱ्या रेती घाटावर स्थानिक लोकप्रतिनिधी (धामणगाव रेल्वे) यांनी पोलिसांच्या सहकार्याने धाड टाकून चार बोटी तसेच अनेक ट्रक जप्त केल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बोटींद्वारे अवैध उत्खनन व अनेक ट्रक रेतीने भरून वाहतूक सुरू होती व तीनशे ते चारशे ब्रास अवैधरित्या साठा केलेला आढळला तसेच कार्यवाहीच्या वेळी तहसिलदारांनी संबंधीत लोकप्रतिनिधींना राजकीय अस्तित्व संपवण्याची धमकी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चांदुर रेल्वेचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार हे रेती व्यावसायिकांना पाठबळ देत असल्यामुळे या घाटातून बोटीद्वारे अवैध उत्खनन अनेक दिवसांपासून सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रात्री ट्रक भरून रेतीची वाहतूक केली जात असल्याची तक्रार वारंवार जिल्हा प्रशासनाला पत्रव्यवहाराद्वारे केली असतानाही तसेच चांदुर रेल्वेचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना याविषयी माहिती दिली असतानाही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधीत अधिका-यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१), (२), (३), (४) व (५) धामणगाव रेल्वे तालुक्यातील गोकूळसरा व इतर रेतीघाटावरून अवैध रेतीचे उत्खनन व वाहतूकीबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून त्याबाबत कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना निर्देशीत करण्यात आले. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यानी दिनांक ०६.०४.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर केलेल्या अहवालानुसार मौजा गोकुळसरा या लिलाव झालेल्या रेतीघाटात दोन रेती भरलेले ट्रक व पाच रेती उपसा करणाऱ्या बोटी व सक्शंन पंप जप्त करण्यात आले असून, मौजा नायगाव लिलाव रेती घाटातुन सात बोट व संक्सन पंप जप्त करण्यात आले. त्यानुषंगाने संबंधीताविरूध्द महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९९६ मधील तरतूदीनुसार उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांनी दंडात्मक आदेश पारीत केलेले आहेत.

तसेच सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. प्रताप अडसड यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे रात्रीला रेती घाटातून अवैध रेती उत्खनन करण्यास पाठबळ देणाऱ्या अधिकारी यांच्येविरूध्द कार्यवाही करण्याबाबत तक्रार केलेली आहे हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी निष्काळजीपणा केलेला आढळुन आल्याने संबंधीत अधिकारी यांच्याविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक १०.०३.२०२२ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना प्रस्ताव सादर केला आहे.

कर्जमाफीच्या दोन्ही योजनांमध्ये पात्र असतानाही कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणेबाबत

(४०) ४६७३७ (०६-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या (ग्रीन लिस्ट) शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केल्या असून सदर याद्यांमध्ये waiver, OTS आणि incentive या प्रकारे शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयातील नमूद निकषान्वये OTS नुसार पात्र घोषित लाभार्थी शेतकऱ्यांनी रु.१.५ लाख वरील रकमेचा भरणा न केल्यास उर्वरित रकमेचा लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील तालुकानिहाय रु.१.५ लाख वरील रकमेचा भरणा केलेले हजारो कर्जदार शेतकरी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेपासून तसेच महात्मा जोतीराव फुले कर्जमाफी योजनेपासून सुध्दा वंचीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेचे कर्जमाफी पोर्टल बंद असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद पोर्टल सत्वर सुरु करुन दोन्ही योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०३-११-२०२२) :(१) होय.
(२) होय. सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २८.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानूसार छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत एकवेळ समझोता योजनेचा (OTS) लाभ घेण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांच्या थकबाकी कर्जाच्या रु. १.५ लाखा वरील उर्वरीत रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे.
(३), (४) व (५) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत OTSया योजनेकरीता बुलढाणा जिल्ह्यातील एकुण ३१८८० शेतकरी पात्र होते, त्यापैकी ६२३९ शेतकऱ्यांनी त्यांच्या थकबाकी कर्जाच्या रु.१.५ लाखावरील उर्वरीत रकमेचा भरणा केल्याने, त्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. तथापी २५६४१ शेतकऱ्यांनी रु. १.५ लाखावरील उर्वरीत रकमेचा भरणा विहीत कालावधीत न केल्याने त्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली नाही. तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील १,९४,९५९ शेतकऱ्यांची खाती पोर्टलवर अपलोड केलेली असून त्यापैकी १,७५,९१५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले असून त्यापैकी १,७४,७२८ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये माफीची रक्कम जमा झालेली आहे. तर उर्वरीत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा करण्यासंदर्भात कार्यवाही चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील माणकेश्वर नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत

(४१) ४७०८६ (०१-११-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील माणकेश्वर नदीपात्रातून कुठल्याही प्रकारची लिलाव प्रक्रिया पार न पाडता गेल्या चार महिन्यापासून दररोज रात्री वाळूचे अवैध उत्खनन करुन पाच ते सहा ट्रॅक्टरद्वारे आसपासच्या गावामध्ये वाळू विक्री होत असल्याच्या तक्रारी करुनही महसूल प्रशासनाकडून कोणतीच कारवाई होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील खडका येथून वॉटरसप्लाय पासून वाळू चोरी, मौजे थार (कवठा) येथील रेती घाटावर नियमबाहय रेती उत्खनन, तसेच पैनगंगा नदीजवळील गावाच्या रेतीपेंडावर अवैध रेती उत्खनन असे संपूर्ण जिल्हयात मर्यादेपेक्षा अधिक रेतीचा उपसा होत असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१), (२), (३) व (४) गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंधक पथकाद्वारे वेळोवेळी माणकेश्वर रेतीघाटास भेट दिली असता, त्याठिकाणी कोणतेही अवैध उत्खनन व रेती साठे आढळून आले नाहीत.

महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील खडका येथील वॉटर सप्लायपासून वाळू चोरी व मौजा थार (कवठा) येथील रेतीघाटावर नियमबाह्य रेती उत्खनन तसेच पैनगंगा नदीजवळ गावच्या रेती घाटावर रेतीचे अवैध उत्खनन झाले नाही.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक प्रकरणी उमरखेड तालुक्यात सन २०२१-२२ मध्ये ४५ वाहनावर कारवाई करून त्यांचेकडून रू. ३२,१४,३८६/- दंड वसुल करून सुमारे ३५१ ब्रास अवैध साठा जप्त केला आहे. महागाव तालुक्यात अवैध वाहतुक प्रकरणी महसूल पथक नेमण्यात आले असून मार्च, २०२२ पर्यत एकुण १८ प्रकरणात रू.१७,०१,०७६/- दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच मौजे बोरी येथे रेतीचा अंदाजे ३५० ब्रास अवैध साठा जप्त करण्यात आला आहे.

चांदूरबाजार व अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील नदीपात्रांतून मोठया प्रमाणात अवैध रेतीचे उत्खनन होत असल्याबाबत

(४२) ४७२९६ (०१-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार व अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील नदी पात्रातून मोठया प्रमाणात अवैध रेतीचे उत्खनन होत असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील रेती उत्खनन रोखण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश देऊनही रेती तस्करांवर प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन तेथील नदीपात्रातील रेती उत्खनन तातडीने थांबवून रेती तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) : (१),(२),(३) व (४) तहसिलदार अचलपूर व चांदूरबाजार यांचे अहवालानुसार माहे मे,२०२२ वा त्यादरम्यान चांदुरबाजार व अचलपूर तालुक्यातील नदी पात्रांतुन मोठया प्रमाणात अवैध रेतीचे उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

अवैध रेतीचे उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना व संनियंत्रणासाठी स्थापन केलेल्या पथकामार्फत २०२१-२२ मध्ये चांदुरबाजार तालुक्यामध्ये एकुण २४ अवैध रेती वाहतूक प्रकरणात कारवाई करण्यात येवून ११,२८,९४२ इतक्या दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. तसेच अचलपूर तालुक्यामध्ये एकुण ४५ अवैध रेती वाहतुक प्रकरणात कारवाई करण्यात येवून २१,५०,९५०/- एवढी दंडाची रक्कम वसुल करण्यात येवून शासन जमा करण्यात आलेली आहे.

तिवसा (जि.अमरावती) येथील महामार्गावर क्रमांका विना ट्रक धावत असल्याबाबत

(४३) ४७३०० (०३-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील महामार्गावर गेल्या काही दिवसांपासून अवैध गौण खनिजांची वाहने आता दिवसा बिनधास्त मार्गक्रमण करीत असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहने विनाक्रमांकाची आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१), (२),(३) व (४) तहसिलदार, तिवसा यांचे अहवालानुसार तिवसा (जि. अमरावती) येथील महामार्गावर गेल्या काही दिवसापासुन अवैध गौण खनिजांची वाहने बिनधास्त मार्गक्रमण करीत असल्याने दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.

तथापि, मौजा ममदापुर (ता. तिवसा) येथे रेती या गौणखनिजाची विना परवानगी वाहतुक केल्या प्रकरणी ट्रक मालकास रू.९८,४००/- इतका दंड ठोठावण्यात आला आहे.

तपासणी पथकातील प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांचेकडून अवैध गौणखनिज वाहतुकीबाबत सन २०२१-२२ मध्ये १०० वाहनावार कारवाई करण्यात आली आहे.

सांगली जिल्ह्यातील सर्कल, तलाठी, कोतवाल यांच्या संगनमताने अनेक गावांत अवैध डोंगर सपाटीकरण होत असल्याबाबत

(४४) ४७७३८ (०३-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील सर्कल, तलाठी, कोतवाल यांच्या संगनमताने अनेक गावांतील डोंगर सपाटीकरण करणे, गायरानाच्या जमिनीत मोठी तळी निर्माण करुन त्यातील मुरुम व दगड यांची अवैध वाहतूक करणे, सदर उत्खननाची रॉयल्टी न भरणे असे अनेक प्रकार स्थानिकांनी माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) : (१), (२) व (३) सांगली जिल्हयामधील सर्व उपविभागीय अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता सांगली जिल्हयामध्ये माहे एप्रिल, २०२२ मध्ये व त्या दरम्यान अशी बाब आढळून आलेली नाही.

उकळीपेन, (ता.जि.वाशीम) येथील पैनगंगा नदीपात्रातून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत

(४५) ४७७४० (०३-११-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उकळीपेन (ता.जि.वाशीम) येथील पैनगंगा नदीपात्रातून बॅरेजच्या आजूबाजूला खड्डे पाडून रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा केला जात असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,महसूल व पोलीस यंत्रणेमार्फत अवैध रेती उपसा थांबविण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली तसेच याबाबत शासनाने किती दंड वसूल केला, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) : (१), (२) व (३) उकळीपेन ता.जि. वाशिम येथील पैनगंगा नदीपात्रातून बैरेजच्या आजूबाजूला खड्डे पडून रात्रीच्या वेळीस मोठ्या प्रमाणत रेतीची अवैध उपसा केला जात असल्याबाबत माहे मे महिन्यात दिनांक २४.०५.२०२२ रोजीच्या दैनिक देशोन्नती वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने तलाठी व मंडळ अधिकारी यांचे पाहणी अहवालानुसार सदर ठिकाणी अवैध उपसा असल्याचे आढळून आले नाही.

जिल्ह्यामध्ये अवैध रेती उपसा थांबविण्यासाठी जिल्हास्तरावर, उपविभागस्तरावर व तालुकास्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली असून, संपूर्ण जिल्ह्यात माहे १ एप्रिल, २०२२ ते ९ जून २०२२ या कालावधीमध्ये एकूण २५ वाहनांवर कारवाई करून रूपये ४८,०८,२६३/- रूपये स्वामीत्वधनाची वसुली शासन जमा करण्यात आलेली आहे.

पालघर येथील शासकीय जमिनीतून परवानगी न घेता बेकायदेशीरपणे मुरुम उत्खनन केल्याबाबत

(४६) ४७८६० (०२-११-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील शासकीय जमिनीतून सिडकोच्या ठेकेदारांनी पर्यावरण विभागाची कुठलीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे मुरुम खोदून शासनाचे कोट्यवधी रुपये बुडविल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षापासून गौण खनिजाची चोरी सुरु असताना त्याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या बेकायदेशीर गौण खनिज उत्खननाची चौकशी करुन शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविणा-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१),(२),(३) व (४) हे खरे नाही.

पुणे कृषी महाविद्यालयाच्या बोपोडी येथील जागेवर पीएमपीएमएलने अतिक्रमण केल्याबाबत

(४७) ४७९०१ (०१-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी महाविदयालयाच्या बोपोडी येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या फ्लॉट नं.१४. मुळारोड येथील जागेवर पीएमपीएमएलने अतिक्रमण केले असल्याचे दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात महाविद्यालयातील प्रशासनाने खडकी येथील मरिआई पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर अतिक्रमण काढून टाकण्याबाबत तसेच कृषी विद्यापीठात असलेल्या जमिनी अकृषी कामाकरीता न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) : होय, खरे आहे.

(१) व (२) कृषि महाविद्यालय, पुणे यांच्या बोपोडी येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या मुळरोड लगतच्या सरंक्षक भिंतीवर पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांचे आरक्षण असल्याबाबतचा मजकुर आढळून आल्याने महाविद्यालय प्रशासनामार्फत खडकी पोलीस स्टेशन, पुणे येथे दिनांक ०२/०३/२०२२ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३) राज्यातील कृषि विद्यापीठातंर्गत शहरात असलेल्या जमिनी अकृषक कामाकरीता / उद्देशाकरीता न देण्याबाबत शासन निर्णय दि.३० जुलै, २००४ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील मौजे वराळे व मौजे खालुम्ब्रे येथे मुरूम या गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याबाबत

(४८) ४८०५१ (०४-११-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील मौजे वराळे येथील गट क्रमांक १६८/२ व १६८/६ या जमिनीतून तसेच मौजे खालुम्ब्रे येथील गट क्रमांक १०८ या जमिनीतून मुरूम या गौण खनिजाचे अवैध उत्खनन करण्यात आल्याप्रकरणी संबंधितांना तत्कालिन तहसिलदार, खेड यांनी अनुक्रमे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ व दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रूपये १,९६,०७,८००/- व रूपये ६४,८२,४००/- इतक्या रकमेचा दंड भरण्याबाबतचे आदेश पारित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अवैध उत्खनन करणाऱ्यांविरूध्द तत्कालिन अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हे दाखल केले होते काय,
(३) असल्यास, संबंधितांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यास होत असलेल्या विलंबाची तसेच संबंधित दोषींवर गुन्हे दाखल न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, दंडाची रक्कम बुडवून शासनाचे कोटयवधी रूपयांच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही न करता संबंधित दोषींना पाठिशी घालणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१), (२), (३), (४) व (५) मौजे वराळे, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट नं. १६८/२ व १६८/६ मधुन संबंधीत कंपनीने अनाधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याच्या अनुषंगाने तहसिलदार, खेड यांनी संबंधीत कंपनी विरूध्द दिनांक ३१.१२.२०१९ च्या आदेशान्वये रु.१,९६,०७,८००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित केले. संबंधीतांनी सदर आदेश उपविभागीय अधिकारी, खेड यांच्याकडे आव्हानीत केले असता, सदर ठिकाणी उत्खनन करण्यात आलेली गौण खनिज सदर कंपनीच्या जागेवर सपाटीकरण व खोलीकरणसाठी वापरल्यामुळे उपविभागीय अधिकारी खेड यांनी दिनांक १८.०२.२०२१ च्या आदेशान्वये तहसिलदार खेड यांनी संबंधीत कंपनीविरूध्द पारित केलेले दिनांक ३१.१२.२०१९ चे आदेश रद्द केले आहे.

मौजे खालुंब्रे, ता.खेड येथील जमीन ग.नं. १०८ मध्ये अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतुक केले वरून संबंधिता विरूध्द तहसिलदार, खेड यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये रू.६४,८२,४००/- इतक्या दंडात्मक रकमेचे आदेश दिनांक ०१.०२.२०२२ रोजी पारित केले. संबंधितांनी सदर आदेश उपविभागीय अधिकारी, खेड यांच्याकडे आव्हानित केले असता, उपविभागीय अधिकारी, खेड यांनी दिनांक ०५.०८.२०२० रोजी सदर प्रकरणी फेरचौकशी करून योग्य ते आदेश तहसिलदार, खेड यांनी पारित करण्याचे आदेश दिले. या उपविभागीय अधिकारी, खेड यांच्या दिनांक ०५.०८.२०२० च्या आदेशाच्या अनुषंगाने फेरचौकशी अंती तहसिलदार, खेड यांनी दिनांक ३०.०६.२०२२ रोजी रू.६४,८२,४००/- इतक्या दंडात्मक रकमेचे संबंधित विरूध्द आदेश पारित केले. सदर दडात्मक रकमेची तहसिलदार, खेड यांच्याकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. अवैध उत्खनन करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेले नाहीत.

अंबरनाथ (जि-ठाणे) येथील गोंधळी समाजाला भटक्या – विमुक्त प्रवर्गात समाविष्ट करून त्यांना जातीचे दाखले मिळण्याबाबत

(४९) ४८०९६ (२०-०९-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गोंधळी समाजाला भटक्या - विमुक्त प्रवर्गात समाविष्ट करून त्यांना जातीचे दाखले देण्यात यावे अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ७/४/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (१४-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) गोंधळी या जमातीची नोंद भटक्या जमातीच्या यादीत अनुक्रमांक १० वर यापूर्वीच समाविष्ट करण्यात आलेली आहे. मा.डॉ.बालाजी किणीकर, आमदार-अंबरनाथ यांच्या निवेदनातील मुख्य मागणी ही या समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता उद्भवत असलेल्या विविध अडचणीबाबत आहे. जात प्रमाणपत्रासंबाधित कामकाज हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून हाताळण्यात येत असल्यामुळे सदरचे निवेदन हे पुढील उचित कार्यवाहीसाठी शासन पत्र क्र. संकीर्ण - २०२२/प्र.क्र.१६३/मावक, दिनांक ०५.०७.२०२२ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) तालुक्यातील शेकडो वीटभट्ट्या व्यवसायाला प्रदूषण मंडळ स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(५०) ४८९८५ (०३-११-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) येथील शेकडो वीटभट्ट्या व्यवसायाला प्रदूषण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर महत्वाची ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वीटभट्टी धारकांना शासनाने नोटीस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वीटभट्ट्या नियमानुसार सूरु नसल्यामुळे त्या बंद करण्यात याव्यात अशा सूचना तहसीलदारांनी वीटभट्ट्या धारकांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीटभट्ट्या बंद झाल्यास यामध्ये काम करणाऱ्या हजारो मजुरांवर बेकारी व उपासमारीची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त वीटभट्टी धारकांना आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-११-२०२२) :(१),(२),(३), (४),(५) व (६) उपविभागीय अधिकारी, अकोट यांच्या अहवालानुसार अकोट तालुक्यात तहसिलदार अकोट यांनी विट्टभट्टी धारकांकडे महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळ व इतर विभागाचे नाहरकत प्रमाणपत्रे नसताना वीटभट्टी सुरू असल्यामुळे तालुक्यातील एकूण २११ विटभट्टी धारकाना मार्च २०२२ मध्ये नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

अकोट तालुक्यात विट्टभट्टी धारकांकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी करीता अर्जाचे संबंधीत कागदपत्रासह ऑनलाईन डाटा फिडींग करून अर्ज भरून घेण्याकरीता मौजे अकोट चोहोटटा बाजार येथे एक खिडकी योजना सुरू करण्यात आली असून प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांच्याकडून प्राप्त

झालेल्या यादीनुसार माहे जून २०२२ पर्यत एकुण १९१ विटभट्टी धारकांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. त्यापैकी ४ अर्ज मंजूर २१ अर्ज रद्द तर उर्वरीत १६६ अर्जावर कार्यवाही सुरू आहे.

अकोला जिल्हयातील विटभटटयाचे नियमन नियंत्रण करणेसाठी तसेच ग्रामिण भागातील रोजगार सातत्याने उपलब्ध व्हावा यासाठी जिल्हा उदयोगाकरीता लागणाऱ्या विविध परवानग्यामध्ये प्रक्रीयेची सुलभता आणण्यासाठी तालुका निहाय एक खिडकी योजना राबवून वेगवेगळया विभागाची ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करून न घेता विटभट्टीधारकाकडून एकसुत्री हमीपत्र स्वाक्षरांकीत करून घेण्यात येत आहे.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.